# भारतातील शिक्षणाच्या अधिकाराचा राजकीय, सामाजिक व कायदेशीर विस्तार

[ अॅड. (डॉ) संतोष अ. शहा ]
कोल्हापूर

## अ. शिक्षणाच्या अधिकाराचे महत्व :–

शिक्षण हा प्रत्येक नागरिकाच्या आणि देशाच्या विकासाचा पाया आहे. शिक्षणाचा अधिकार मुख्यत: प्राथमिक शिक्षणाचा अधिकार हा कोणत्याही देशाच्या प्रगती करिता एक महत्वाची गोष्ट मानली गेलेली आहे. त्याचे महत्व खालील मुदयांवरून स्पष्ट होते.

१. भारताला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे होवून सुध्दा भारताचा साक्षरतेचा आलेख अजूनही कमीच आहे. हा आलेख उत्तुंग करणे आपल्यासारख्या देशाला जो या २१ व्या शतकात जगातील एक अतिबलवान राष्ट्र बनण्याचे स्वप्न पहात आहे, त्यासाठी अत्यावश्यक आहे.

२. शिक्षण आणि मानवी अधिकार – राजकीय, सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक मानवी अधिकार व प्राथमिक शिक्षण हे एकमेकांशी संबंधीत आहेत. जागतिक मानवी अधिकारांचा जाहीरनामा १९४८ सांगते की, "शिक्षणाने माणसाचे व्यक्तिमत्व सुधारते तसेच मानवी अधिकार व मुलभूत स्वातंत्र्य यांच्यासाठी असलेला आदरही दृढ बनवते. शिक्षण हे सर्व देशांमध्ये तसेच सर्व जाती व धर्मामध्ये समजूतदारपणा, सहनशिलता व मैत्रिची भावना वाढविण्यास मदत करते. तसेच शांतता प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत असलेल्या संघराज्यांना मदत करते." शिक्षणाचा अधिकार हा भारताच्या आंतरराष्ट्रीय जबाबदारीचाच एक भाग आहे, कारण भारताने वरील जाहीरनामा स्विकारला आहे. सदरचा जाहीरनामा हा सर्व देशांसाठी व सर्व लोकांसाठी एक सर्वसाधारण प्रमाणभूत नमुना आहे, जो मानवी अधिकार व शिक्षणाला जोडणारा दुवा आहे.

३. शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे लोकशाहीला बळकटी देते व लैगिक भेदभाव कमी करण्यास मदत करते.

४. भारतातील प्रत्येक निवडणूकीमधून हे दिसते की, प्रत्येक निवडणूक जात,धर्म, पैस व स्वार्थी हेतूने राजकारणावर आधारित लढल्या जातात. त्यामुळे आपल्या देशात भ्रष्टाचार व राजकीय गुन्हेगारी वाढत आहे याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या मतदारांचा शिक्षणातील अभाव होय.

५. गरिबी, असमानता आणि निरक्षरता या तिन्हीही गोष्टींचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. भारतात शिक्षणाचा व विकासाचा जवळचा संबंध असलेचे दिसून येते. उदा. राजस्थान, बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये देशातील इतर राज्यांच्या तुलनेत सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेली आहेत कारण या राज्यांचा शिक्षणाचा आलेख कमी आहे.

६. साक्षरता, विशेषकरून स्त्रियांमधील साक्षरता ही लोकसंख्या वाढीला आळा घालते.

७. ज्याठिकाणी निरक्षरतेचे प्रमाणे जास्त आहे, अशा ठिकाणी बालमजूर पध्दती विस्तारलेली दिसते.

८. शिक्षणाने व्यक्तीची सर्वंकष प्रगती होते. शिक्षण हे सामाजिक क्रांतीच्या प्रगतीमध्ये येणारा जातीधर्मातील, स्त्री पुरूषांमधील दुजाभाव मोडून काढते आणि स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करते. शिक्षणाने व्यक्तीस स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत:साठी लढण्याचे बळ प्राप्त होते.

ब. **भारतातील शिक्षणाच्या अधिकाराचा राजकीय, सामाजिक व कायदेशीर इतिहास :–**

ए. **स्वातंत्र्यपूर्व काळ –**

भारताचा स्वातंत्र्यपूर्व काळ हा तीन भागात विभागला गेला आहे.

१. **ब्रिटीशपूर्व काळ** –ब्रिटीशपूर्व काळात देशात जाती पध्दतींचे वर्चस्व होते. त्यामुळे शिक्षण हे केवळ उच्च जातीच्या लोकांपूरतेच मर्यादित होते.

२. **ब्रिटीश काळ** – ब्रिटीशांनी भारतात शिक्षण पध्दती ही केवळ भारतातील व्यवस्थेवर राज्य करण्याच्या हेतूने आणली.

येथे हे साभिप्राय नमूद करणे गरजेचे आहे की, काही वैभवशाली राज्यांमध्ये ज्यामध्ये कोल्हापूरचा समावेश आहे अशा ठिकाणी राजर्षी शाहू महाराजांच्या काळात (सन १८७४ –१९२२) मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यात आला.

३. **स्वातंत्र्य लढा** – स्वातंत्र्याच्या लढयामध्ये ब–याच नेत्यांनी विशेषत: महात्मा गांधींनी सार्वत्रिक शिक्षणाला महत्व दिले. महाराष्ट्रात महात्मा फुले, कर्मवीर भारउराव पाटील यांनी शिक्षणाचा अधिकार व स्त्रियांना शिक्षण मिळण्यासाठी महत्वाची कामगिरी केली.

बी. स्वातंत्र्यानंतरचा काळ –

१. **भारताच्या राज्यघटनेत ८६ वी दुरुस्ती करून शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकार दुरूस्त केला गेला त्यापूर्वीचा काळ :–**

ए. **भारताच्या राज्यघटनेची उददेशिका :–**

भारतीय राज्यघटनेतील उददेशिकेमध्ये नमूद स्वातंत्र्य, समानता, लोकशाही आणि न्याय शिक्षणाशिवाय प्राप्त करता येवू शकत नाहीत.

बी. **भारताच्या संविधानामधील कलम ४५** – मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद पुढीलप्रमाणे होती .

"राज्य हे या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षाच्या कालावधीच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहील."

कलम ४५ हा भारताच्या संविधानातील निर्देशक तत्वांचा भाग आहे. निर्देशक तत्वांमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी कोणत्याही न्यायालयाकरवी अंमलबावणीयोग्य नाहीत. तथापी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नमूद केल्याप्रमाणे सरकारसाठी व नागरीकांसाठी मार्गदर्शनाचा दिवा दाखविण्यासाठी निर्देशक तत्वे उपयोगी आहेत. तसेच डॉ. आंबेडकराची अशी अपेक्षा होती की, भारतीय नागरीकांनी निवडणूकीच्यावेळी विशिष्ट पक्षाला, व्यक्तीला मत देताना ती व्यक्ती अथवा पक्ष निर्देक्षक तत्वांना कितपत बांधील आहे, याचा विचार करून मत देता येईल. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देशक तत्वांचा वापर, मुलभूत अधिकारांना अर्थ देण्यासाठी केलेला आहे.

सी. **कलम २१ – जीवीत आणि व्यक्तीगत स्वातंत्र्य –**

"कायदयाव्दारे प्रस्थापित केलेली कार्यपध्दती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवीत किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही."

मणेका गांधी विरूध्द युनियन ऑफ इंडिया (ए.आय.आर १९७८ सुप्रिम कोर्ट ५९७) या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ चा अर्थ विस्तृतपणे दिलेला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ मधील जीवीताचा अर्थ "चांगले जगण" असा केला आहे आणि म्हणून जीवीताच्या अधिकाराचा भाग म्हणजे चांगले जगणेसाठी जे जे गरजचे आहे ते सर्व त्याचा भाग असलेचे माणनेत आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ खाली पर्यावरणाचे अधिकार, एकांताचा अधिकार, आरोपित व्यक्तींचे अधिकार इत्यादीं अनेक अधिकारांचा समावेश केला आहे. आता कलम २१ चा वापर सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचे अधिकाराबाबत कसा केला हे पाहू.

डी. **सर्वोच्च न्यायालय आणि शिक्षणाचा अधिकार :-**

मोहिनी जैन विरूध्द स्टेट ऑफ कर्नाटक, १९९२ या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे निरिक्षण केले आहे की,

"संविधानातील शिक्षणाच्या अधिकाराचा कलम ४५ प्रत्यक्षात अंमलात न आणलेस, आपल्या संविधानातील सर्व मुलभूत अधिकार भारतीय जनतेपासून दूर राहतील."

उन्नी कृष्णन विरूध्द आंध्र प्रदेश, १९९३ या केसच्या निकालामध्ये न्यायमुर्ती बी.पी. जीवनरेडडी यांनी असे नमूद केले आहे की, "शिक्षणाचा मुलभूत अधिकार हा राज्यघटनेच्या कलम २१ (जीवीताचा अधिकार) मध्ये अंतर्भुत आहे. कलम २१ आणि कलम ४५ यांचे एकत्रित वाचन करता शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकार असलेचे स्पष्ट होते. लोकशाहीची सार्वत्रिक शिक्षण व सुजान नागरीक ही प्रमुख अंगे आहेत कलम २१ व ४५ मधील शिक्षणाचा अधिकार म्हणजेच :- भारतातील प्रत्येक मुलाला वयाच्या १४ वर्षापर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार आहे. १४ वर्षानंतर मात्र शिक्षणाचा अधिकार हा देशाच्या आर्थिक परिस्थितीवर आणि प्रगतीवर अवलंबून आहे".

इ. २००२ मधील भारताच्या राज्यघटनेतील ८६ व्या दुरूस्तीनुसार कलम २१ ए चा समावेश करून शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकार करण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर जवळपास एक दशकानंतर २००२ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने घटनेत ८६ वी दुरूस्ती करवून शिक्षणाच्या अधिकाराला औपचारिकरित्या घटनात्मक मुलभूत अधिकाराच्या कक्षेत आणले.

"२१ ए. या देशातील प्रत्येक बालकाला त्याची वयाची ६ ते १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे."

तसेच संसदेने कलम ४५ मध्ये सुधारणा केली व कलम ५१ ए के घटनेत समाविष्ट केले ते पुढीलप्रमाणे :-

नविन कलम ४५ - "या देशातील प्रत्येक बालकाला त्याची वयाची ६ वर्षे पूर्ण करेपर्यंत शिक्षण व बालकल्यानाची तरतूद केली जाईल."

कलम ५१ ए मधील दुरूस्ती - भारतीय संविधानात कलम ५१ ए मधील पोटकलम जे नंतर पोटकलम के खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात आला.

"पोटकलम के – पालकांनी किंवा काही प्रकरणामध्ये जे पालक ६ ते १४ वर्षे वयोगटातील अज्ञान मुलांसाठी अ.पा.क म्हणून नेमले गेले आहेत त्यांनी आपल्या मुलांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दयावी."

**मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मुलांच्या अधिकाराचा कायदा, २००९ –**

भारतीय संसदेने कायदयाच्या स्वरूपात प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत अधिकार मान्य करूनही तो प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी ८ वर्षाचा कालावधी गेला. शिक्षणाचा अधिकर कायदा २००९ हा १ एप्रिल २०१० रोजी अंमलात आला.

भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग त्याप्रसंगी म्हणाले की, "मी आज जो काही तो केवळ शिक्षणामुळेच , माझी अशी इच्छा आहे की, या देशातील सर्व मुला मुलींना शिक्षण हे मिळालेच पाहिजे. " भारत हा जगातील १३५ देशातील एक आहे ज्याने प्रत्येक मुलासाठी शिक्षणाचा मुलभूत अधिकार आता मान्य केला आहे, व त्याच्या अंमलबजावणीसाठी कायदा केला आहे.

**शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ ची मुख्य वैशिष्टये खालीलप्रमाणे :-**

१. मुल म्हणजे ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलगा किंवा मुलगी .

२. प्राथमिक शिक्षण म्हणजे १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण.

३. शाळा म्हणजे सरकारने मान्य केलेल्या शाळा व ज्यांचा समावेश

   १. सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा जेथे मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण दयावे लागेल.

   २. अनुदानित खाजगी शाळा – त्यांना मिळणा–या अनुदानाच्या व खर्चाच्या रक्ककमेचा मेळ घालून किमान २५ टक्के इतक्या रक्कमेचा वापर मोफत शिक्षणासाठी केला पहिजे.

   ३. विशिष्ठ प्रकारच्या शाळा उदा– केंद्रीय विदयालय, नवोदय विदयालय, सैनिकी शाळा व विना अनुदानित खाजगी शाळा – पहिल्या इयत्तेत या शाळांनी किमान २५ टक्के मुले गरिब व प्रतिकुल परिस्थितीती गटातील घ्यावीत व त्यांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दयावे. याच्या खर्चाचा परतावा सरकार या शाळांना करेल.
   सर्वोच्च न्यायालयाने देखील गरिब मुलांना खाजगी शाळेत २५ टक्के आरक्षण देणेच्या तरतुदीचा अंम्मल करणेचा आदेश दिलेला आहे. (स्त्रोत –टाईम्स ऑफ इंडिया, डिसेंबर २२,२०१० )

   ४. प्रत्येक मुलाला त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईतोपर्यंत (१ ली ते ८ वी : वयोगट ६ ते १४ ) मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. :- मुलांसाठी मोफत, राज्यासाठी सक्तीचे.

   ५. शिक्षणाचा अधिकार या कायदयाच्या तरतूदीमधील अंमलबजावणीसाठी पैसा उपलब्ध करून देणे ही केंद्र सरकारची व राज्य सरकारची एकत्रित जबाबदारी आहे.

   ६. कोणत्याही शाळेतील विदयार्थी शारिरीक शिक्षेस किंवा मानसिक त्रासास अधिन असणार नाही. जो काणी अशा तरतूदीचे उल्लंघन करेल तो

७. शिक्षणाचा अधिकार या कायदयाचा आरंभ झाल्यापासून ६ महिन्याच्या आत विदयार्थी शिक्षण प्रमाण परिशिष्टमध्ये ठरविलेप्रमाणे आणले जाईल.

८. लोकसंख्या शिरगणती, संकटकाळातील मदतीचे काम आणि निवडणुकीचे काम ही अशैक्षणिक कामे सोडून कोणत्याही शिक्षकास इतर अशैक्षणिक काम करावे लागणार नाही.

९. कोणत्याही शाळेतील शिक्षक वैयक्तीक शिकवण्या घेवू शकत नाही.

१०. कोणत्याही विदयार्थ्याला प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत बोर्डाची परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे नाही.

११. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शाळेतील शिक्षकांची अनुरूप व्यावसायिक पात्रता ५ वषात व शाळेची संरचना ३ वर्षात सुधारण्याची तरतूद केली गेली.

१२. पालाकांच्या मुलाखती, देणगी किंवा भांडवली फी यांना मनाई व असे कृत्य कायदयानुसार गुन्हेगारीचे मानण्यात येईल.

१३. जे शाळेमध्ये मागे पडत आहेत त्यांच्यासाठी त्यांच्याच वयाच्या मुलांबरोबर शाळेमध्ये खास प्रशिक्षणाची तरतूद केली आहे.

१४. मुलांच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी २००७ मध्ये राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली.

**महत्वपूर्ण विश्लेषण** :– इतके दिवस वाट पाहून झालेल्या कायदयाचे स्वागत करूया.

१. मुलत: कायदयाचा उददेश मोफत शिक्षण हाच आहे. पण मोफत शिक्षण म्हणजे काय हे स्पष्ट नाही. जर मोफत शिक्षण म्हणजे फक्त शाळेच्या फी पासून सवलत असेल तर खालील आकडेवारी डोळे उघडविणारी आहे. :– इकॉनॉमिक व पोलिटिकल विकली अभ्यास हे दर्शविते की, शिक्षणाच्या खर्चावरील ५ रू इतक्या रक्कमेपैकी २० पैसे इतकीच रक्कम शैक्षणिक फी साठी खर्च केली जाते किंवा वापरली जाते. मग प्रश्न येतो की, बाकीचे ४.८० पैसे कुठे जातात व ते कसे उपलब्ध होणार?

२. कायदयाने गरीब व प्रतिकुल परिस्थितीतील विदयार्थ्यांना २५ टक्के सक्तीचे आरक्षण ठेवले आहे. हे ठरविणे वादग्रस्त की, या गटात कोण येतात.

३. प्रथम या अशासकीय सेवा संस्थेच्या नविन अहवालाच्या सर्व्हेक्षणावरून मुलभूत गणित करण्याच्या विदयार्थ्यांच्या पात्रतेमध्ये –हास होत आहे, अस दिसून येते. वर्ग ५ मधील ५३.४ टक्के विदयार्थी वर्ग २ च्या स्तरावरील पुस्तके वाचू शकतात. खाजगी शाळेमधील आणि खाजगी शिकवण्यांमधील हजरेपटावर शिक्षकांची मोठी वाढ होत आहे तर सरकारी शाळांमध्ये शिक्षकांची उपस्थिती कमी होत आहे. (स्त्रोत : टाईम्स ऑफ इंडिया, फेब्रुवारी १६, २०११)

४. कायदयाच्या अंमलबजावणीसाठी पैसा उपलब्ध करून देणे ही राज्य सरकारची व केंद्र सरकारची जबाबदारी आहे. पण शिक्षणाला प्राधान्य देणे हे केंद्र व राज्यसरकारच्या राजकीय संबंधामुळे वादग्रस्त बनले आहे. कोठारी कमिशनच्या अहवालानुसार क्रेद्रशासनाकडून शिक्षणासाठीच्या पैशाच्या तरतूदीत ३ टक्केमध्ये वाढ अपेक्षित होती. केंद्र सरकारने याकडे अनेक वर्ष अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. कायदयाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून ६५ टक्के सहाय्य तर राज्य

सरकारकडून ३५ टक्के सहाय्य अपेक्षित आहे. कायदयाच्या अंमलबजावणीसाठी वर्षाला अंदाजे ३५,०००/- करोड रूपये आवश्यक आहेत.

५. कायदयाच्या अंमलबजावणीसाठी आधारभूत संरचना व जवळ जवळ ५ लाख जादा शिक्षकांची गरज आहे. कायदयाने विदयार्थी शिक्षण गुणोत्तर ३०:१ असे ध्येय ठेवले आहे ते संपादित करणे कठिण आहे.

६. कायदयात दुपारच्या जेवाणची योजना नमूद केलेली नाही. सर्वोच न्यायालयाच्या निरिक्षणात असे दिसून आले आहे की, ग्रामीण भागातील मुले व गरिब मुले दुपारचे जेवण असल्याशिवाय शाळेत येवू व राहू शकत नाहीत. (स्त्रोत - सिव्हील लिबरटिज ऑरगनायझेशने दाखल जनहित याचीका)

७. कायदयामध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय लोकांविषयी, भटक्या जाती, जमातीविषयी कोणतीही स्पष्टता नाही.

८. निवासी शाळा व प्रयोगात्मक शाळा याकडे कायदयाने दुर्लक्ष केलेले आहे.

९. काही अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांनी सर्वोच्च न्यायालयात असे आव्हान केले आहे की, कायदयातील तरतूदी या घटनेच्या कलम ३० मधील अल्पसंख्यांकांच्या अधिकाराचे उल्लंघन करतात. सर्वोच न्यायालयाच्या या बाबतीतील निर्णयाची प्रतिक्षा आहे.

१०. या कायदयामध्ये मुले शाळा सोडून जातात या अडचणीविषयी काहीही तरतूद केलेली नाही.

<u>काही आकडेवारी :-</u>

१. काही आशियन, आफ्रिकन आणि मुस्लिम देशांपेक्षा भारताचा साक्षरतेचा आलेख कमी आहे.

२. भारतातील जवळ जवळ १६ कोटी इतकी मुले ० ते ६ या वयोगटातील आहेत. त्यांना अर्थातच शिक्षणाचा अधिकार प्राप्त झालेला नाही.

३. शिक्षणाच्या अधिकाराच्या कायदयाबाबत स्थापन केलेल्या एका कामिटीने सदर कायदयाच्या अंमलबजावणीसाठी १ लाख७१ हजार करोड रू. इ. रक्कम पुढील ५ वर्षात उपलब्ध करून दयावी लागणार आहे असे अनुमान काढलेले आहे. एप्रिल २०१० मध्ये केंद्र सरकारने सदर रक्कमेपैकी ६५ टक्के रक्कम केंद्र सरकार तर ३५ टक्के रक्कम राज्य सरकार देईल असे आश्वासन दिलेले आहे. परंतू २०१० सालाच्या मध्यामध्ये उपरोक्त रक्कम रू. १ लाख ७१ हजार करोड वाढवून २ लाख ३१ हजार करोड इतके झाल्याचे अनुमान काढले गेलेले आहे.

<u>सूचना :-</u>

१. प्राथमिक शिक्षण कायदयातील किमान ६ वर्षे हे वय काढून टाकण्याची गरज आहे. किमान ६ हे वय सर्वोच न्यायालयाच्या निकाला विरोधक आहे. कलम ४५ मध्ये

किंवा उन्नी कृष्णन व मोहिनी जैन यांच्या निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयो कोठेही किमान ६ वर्ष वयाचा उल्लेख केलेला नाही. वैदयकीय शास्त्र सांगते की मुलाची बौध्दीक वाढ ही वयाच्या ६ वर्षापर्यंतच जास्त असते.

२. आपल्या अनुभवानुसार व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या म्हणण्यानुसार दिल्लीमधून जो १ रूपया काही हेतूसाठी पाठवला जातो त्यातील फक्त २५ पैसे तो हेतू साध्य करण्यासाठी वापरले जातात. त्यामध्ये ७५ % गळती आढळते. याचे महत्वाचे कारण म्हणजे भ्रष्टाचार, नौकरशाही होय. हे सर्व थांबविण्यासाठी सरकारला, स्थानिक संस्थांना पैसा देण्याऐवजी शिक्षणासाठी पालकांना "शैक्षणिक प्रमाणलेख" ( शैक्षणिक व्हाउचर्स) देण्याचा प्रयोग केला पाहिजे. शिक्षण प्रमाणलेख पध्दती अमेरिका, स्विडन या देशांमध्ये व दिल्ली मध्ये सेंटर फॉर सिव्हील सोसायटी या संघटनेने एका भागात प्रायागीक तत्वावर यशस्वीपणे वापरली आहे. शिक्षणाच्या प्रमाणलेखामुळे पालकांना त्यांच्या पसंतीची शाळा निवडण्यास मदत होईल आणि यामुळे मुलांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी, मुलांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये स्पर्धा निर्माण होईल. शिक्षकांचा पगार पालकांकडून दिला गेलेने, शिक्षक अधिक जबाबदार होतील. सध्याच्या सार्वजनिक व खाजगी भागीदारीच्या युगात हा प्रयोग आवश्य करून पहावा. अर्थातच शैक्षणिक प्रमाणलेख ( शैक्षणिक व्हाउचर्स) चा वापर करण्यामध्ये काही अडचणी व त्रूटी येवू शकतील. परंतू सध्याच्या शाळांना अथवा शैक्षिणिक संस्थांना सरळ पैसे देण्याची पध्दती निश्चितच समाधानकारक नसलेने, भ्रष्टाचाराने बरबटलेली असलेने आणि सर्व पैसा शिक्षणासाठी वापरला जात नसलेने ( शैक्षणिक व्हाउचर्स) पध्दतीचा प्रयोग आवश्य करून पहावा. अर्थात मला याची पूर्ण जाणीव आहे की, या देशातील सध्याची राजकीय परिस्थिती व नोकरशाही असा प्रयोग हाणून पाडण्याचा निश्चितच प्रयत्न करेल. कदाचित यासाठी आपल्या देशामध्ये इस्राईल सारखी क्रांती व्हावी लागेल. वास्तविक पाहता अशा प्रकारचे शैक्षणिक व्हाउचर्स देणेचा प्रयोग केवळ शैक्षणिक क्षेत्रात नव्हेतर अनेक क्षेत्रात जेथे जेथे सरकारी पैसा वापरला जातो तेथे तेथे व्हावा असे मला वाटते.

३. फक्त शिक्षणाचा अधिकार देणे इतके पूरेसे नाही तर अर्थपूर्ण, दर्जेदार व आनंददायी शिक्षण हवे. आपणाला हा अनुभव आहे की, मुलांना शाळेला जाणे आवडत नाही. आणि मुले शाळेला जाताना रडतात. शिक्षणाबददल मुलांच्यात उदासिनता दिसते कारण स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे होवूनही आपण आपल्या शाळेतील फळयाचा काळा रंग इतर रंगात बदललेला नाही, जेणेकरून मुले त्याकडे आकर्षले जातील. मुलांना काळया पांढ–या रंगाऐवजी रंगीबेरंबगी रंग आवडतात. मुलांना खेळणे, चित्र काढणे, गाणी म्हणणे, नृत्य करणे हे आवडते. पण आपले शिक्षण असे करण्यापासून मुलांना सतत रोखत असतात. आपल्याला शाळांमध्ये या आनंददायी शिक्षण देणेची नितांत गरज आहे. असे प्रयोग देशातील खाजगी शाळांत होत असलेने त्यांच्या संख्येत व पालाकांचा अशा शाळेत आपले पाल्य पाठविण्याचा कल यात वाढ झालेचे दिसते.

एकीकडे सरकारी स्थानिक संस्थांमध्ये शिक्षणाबाबत उदासिनता दिसून येते तर दुसरीकडे खाजगी शाळांमध्ये चांगले शिक्षक, चांगली संरचना, विदयार्थी शिक्षकांचे प्रमाण व शिक्षण विषयक नवनविन संकल्पना यामुळे खाजगी शाळांची मागणी वाढत आहे. दुर्देवाने हे आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये असमानता आणत आहे.

एम.सी.छागला (सरन्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय) व शिक्षणमंत्री (१९६४) याचे शब्दात :-

"आपल्या घटनाकारांचा असा उददेश नव्हता की, मुलांना फक्त छोटेसे संकुल करून त्यात ठेवून, अप्रशिक्षक शिक्षक पुरविणे, अयोग्य वहया पुस्तके पुरविणे, खेळण्सासाठी मैदान न पुरविणे कलम ४५ मध्ये घटनाकारांना असे म्हणायचे होते की, ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना दिलेले शिक्षण म्हणजे चांगले शिक्षणच असले पाहिजे."

४. दर्जात्मक शिक्षणसाठी व जागतिकीकरणाच्या युगास अनुसरून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ज्यामध्ये इंटरनेट वेब कॅम्प्स इत्यांदीची निश्चितच मदत होईल.

५. आपल्या देशातील मागासलेल्या भागात, आदिवासी भागात, गरीब मुलांना शिक्षण मिळावे म्हणून आय.आय.टी, अशासकीय सेवा संस्था मधून शिक्षित असे अनेक तरूण तसेच आमिरखान सारखे नायक स्तुत्य कामगिरी करत आहेत. असे प्रयत्न स्तुत्य आहेत. त्यांना प्रोत्साहन दयावे.

६. केंद्र शासनाकडून सर्व शिक्षा अभियान २००१ मध्ये सुरू झालेले असून, त्या अंतर्गत केंद्र शासनास प्रत्येक मुलामागे प्रत्येकी रू. १७००/- वार्षिक खर्च करावा लागणार आहे.

७. शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी जेष्ठ नागरीक, निवृत्त शिक्षक, गृहिणी यांना प्रोत्साहन देवून त्यांचा सहभाग त्यामध्ये करावा.

८. प्रयोगात्मक शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे उदा. अक्षरनंदन, पुणे, सृजन आनंद, कोल्हापूर.

९. अर्थपूर्ण, दर्जात्मक व आनंददायी शिक्षण देण्यासाठी प्रबळ पालकांच्या संघटनांची आवश्यकता आहे.

१०. सर्व राज्यांनी शिक्षण अधिकार कायदयानुसार नियम बनविणे गरजेचे आहे.

११. शिक्षण हा राजकारणाचा, देशाच्या प्रगतीचा व मानवी हक्कांचा प्रमुख भाग बनणेची गरज आहे.

समारोप :-

आपणास हे कधीही विसरून चालणार नाही की, शिक्षणातील गुंतवणूक ही देशाच्या विकसासाठी केलेली गुंतवणूक आहे.

येथे एका चांगल्या बाबीचा उल्लेख विशेष करणेची आवश्यकता आहे की, केंद्रसरकारच्या अर्थमंत्र्यांनी २०११-१२ च्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठीची तरतूद रू. ५२,०५७ करोड इतकी वाढविलेचे सांगितले तर सर्व शिक्षा अभियानाला १५ करोड इतकी तरतूद केलेली आहे.

तसेच सन २०११ च्या शिरगणतीनुसार भारताच्या साक्षरतेच्या प्रमाणात ९.२ टक्के इतकी वाढ होवून आत्ताचे साक्षरता प्रमाण ७४.०४ टक्के इतके असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच वरील साक्षरता प्रमाणामध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेमध्ये ११.८ टक्के इतकी वाढ झालेचे तर पुरूषांच्या साक्षरतेमध्ये ६.९ टक्के वाढ झालेचे नमुद केलेले आहे. ही बाब देखील या देशाची साक्षरता व विशेषकरून स्त्रियांच्या साक्षरतेबाबतीत समाधानकारक होय.

असे म्हटले जाते की अंधाराला दोष देणे ऐवजी आपण जेथे जेथे छोटा का असेना मेणबत्ती एवढा प्रकाश निर्माण करू शकलो तर तसा आवश्य प्रयत्न करावा. हजार मैलाचा प्रवास हा नेहमी एक पाउल टाकलेनेच सूरू होतो हे आपण विसरता कामा नये. वरील सर्व बाबींचा विचार करून भारतातील शिक्षणाच्या अधिकारासाठी जनजागृती व सुजान नागरीकांची आवश्यकता आहे. हा लेख भारतातील शिक्षणाच्या अधिकाराचे छोटे पाउल ठरून हजारो भारतीय मुलांच्या जीवनामध्ये प्रकाशाची एक ज्योत निर्माण करेल, अशी आशा मी व्यक्त करतो.

**[ ॲड. (डॉ) संतोष अ. शहा ]**
कोल्हापूर
ई-मेल – advdrshah@gmail.com